## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

## (दिनांक १९.०३.२०१६ ची सर्वानुमते तहकुब करण्यात आलेली अर्थसंकल्पीय विशेष सभा)

शनिवार, दि. ३१.०५.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा.सौ.शैलजा किशोर स्वामी,महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कदम गंगाबाई नारायण |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| चव्हाण आनंद शंकरराव | फारुख अली खाँ इलीयास खाँ |
| आनेवार गंगासागर संदीप | आनेवार गंगासागर संदिप |
| भवरे किशोर दामोधर | कदम शिला सुनिल |
| प्रमोद मुरलीधराव खेडकर | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश |
| जाधव जयश्री आनंद | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| मुदिराज कमलबाई रामस्वामी | रजिया बेगम अयुब खान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख बालासाहेब गंगाधराव |
| गफार खान गुलाम महमंद खान | अनुजा अमितसिंह तेहरा |
| यादव तुलजाराम गणेशलाल | गिल सरजीतसिंघ पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | अ. सत्तार अ.गफुर |
| स. शेर अली स. महेबुब अली | फारुख हुसेन कासीम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस |
| गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल |
| लतीफा बेगम बु-हाण खान | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| ठाकूर अन्नपुर्णा जम्मुसिंह | किशोर किशनलाल यादव |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक रमेशराव सौदे | सौ.ललिता मुंकुंदरा बोकारे |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| येवनकर विजय हिराचंद | कदम विश्वास बालाजी |
| अड बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.शैलजा किशोर स्वामी महापौर हे होते तसेच प्राधिकृत अधिकारी तथा उपआयुक्त , श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (विकास), श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. स्मीता ठाकरे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री विजय मुंढे, प्र.उपायुक्त (महसुल), श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता(साबांवि). श्री सुगीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**महापौर** वंदेमातरमने सभेला सुरुवात करण्यात येते.

**स.सरजितसिंघ गिल** नगरपालिकेचे माजी नगरसेवक शेख हुसनोददीन यांचे दुःखद निधन झाले आहे. श्री नानकसिंग चंदल यांचेही निधन झाले आहे यांना श्रध्दाजंलीचा अर्पण करण्यात यावी.तसेच श्री खांडील यांचे देखील दुःखद निधन झाले आहे. अड.फारुख यांचे ही निधन झालेले,त्यांना सुध्दा श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

**दिपकसिंघ रावत** मनपाच्या नगरसेविका सौ. मुंडे यांचे सासरे यांचेही निधन झाले आहे त्यांना सुध्दा श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

**अशोक उमेरकर** ज्या महान व्यक्तीचे दुःखद निधन झाले आहे त्यांना श्रध्दाजंली प्रथम अर्पण करण्यात यावी यासाठी माझे अनुमोदन आहे.

**आनंद चव्हाण** या व्यतिरिक्त आणखी नांवे काही नांवे असल्यास त्यांचा सुध्दा श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी त्यांच्या नांवाचा समावेश करण्यात यावा व श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे स्थब्ध राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

**महापौर** नांदेड शहरातील ज्या महान व्यक्तीचे निधन झाले असल्यामुळे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे स्थब्ध राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्रं. ०१** **ठराव**

माजी नगरसेवक श्री म. हुसनोद्दीन, अड. खांडील यांचे निधन झाल्यामुळे त्यांनाव भावपुर्ण श्रध्दांजली ही नावाशमनपा विशेष सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**प्रमोद (बंडु) खेडकर** प्राधिकृत केलेल्या आयुक्तांना कोणते निर्णय घेण्याचे अधिकार आहेत काय याचा खुलासा करावा. दुसरी गोष्ठ म्हणजे या विषय पत्रिकेवर याच अधिका-याचा विषय असतांना त्यांना सभागृहात उपस्थित राहता येते का ? बिएसयुपी विभागात कार्यरत असतांना मनपाने दोन अभियत्यांना निलबिंत केले आहे व बिएसयुपीच्या कामाच्या संदर्भात या अधिका-यास तशी नोटीस देण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना या ठिकाणी बसण्याचा अधिकार आहे का ? याचाही खुलासा करण्यात यावा. त्याच्या नंतर मिटींग घेण्यात यावी.

**अब्दुल सत्तार** महानगरपालिकेची ही सर्वात मोठे सभागृह आहे. या सभागृहात प्रभारी आयुक्त हे उपस्थित नाहीत. आपण त्यांच्याकडून वेळ घेतला होता आणि त्यासाठी त्याप्रमाणे सभेची तारीख निश्चीत करण्यात आली होती. सभेची तारीख त्यांच्याकडून देवूनही ते उपस्थित नाहीत हे योग्य नाही यामुळे महासभेचा अपमान झालेला आहे. या पुर्वी मा. श्री मोपलवार साहेब, मा.श्री धिरजकुमार साहेब यांच्याकडे मनपा आयुक्त पदाचा पदभार होता त्यावेळी ते या महासभेस उपस्थित राहत होते. पाण्याचा हा ज्वलंत विषय आहे यांना काय झाले उपस्थित राहणेसाठी हे कळायला मार्ग नाही. प्रभारी आयुक्तांनी महासभेस उपस्थित राहीले नसल्यामुळे मा. प्रभारी आयुक्त यांचा निषेध करतो.

**स. शेर अली** निषेधामध्ये आम्ही सुध्दा सामिल आहोत.

**दिपकसिंघ रावत** सध्या नांदेड शहरामध्ये पाण्याची गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. प्रभारी आयुक्त हे जिल्हयाचे जिल्हाधिकारी आहेत ते पाण्याबाबत काही गंभीर नाहीत. मनपाकेस कायम स्वरुपी आयुक्त देखील नाहीत. प्रभारी आयुक्त यांनी सभागृहाचा अपमान केला आहे म्हणुन मी सभागृहास विनंती करतो की, त्यांनी सभेस उपस्थित राहीले नाही म्हणुन त्यांचा निषेध करतो व हा निषेधाचा ठराव पास करुन तो ठराव हा महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात यावा. कोणत्या अधिकाराने उप आयुक्त यांना प्रभारी आयक्त म्हणुन सभेत बसविण्यात आले आहे याचा देखील खुलासा करण्यात यावा. बिएसयुपी प्रकरणात दोन अभियंते श्री दंडे व देशमुख यांना निलबिंत करण्यात आलेले आहे. त्या प्रकरणात यांचाही समावेश आहे त्यामुळे त्या प्रकणात निर्णय कोण घेणार आहे यांना निर्णय घेता येतो काय

**अब्दुल सतार** प्रभारी आयुक्त यांना काही सभागृहाची काही गंभीर नाही.

**दिपकसिंघ रावत** मी एक स्थगन प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्या प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी.

**महापौर** सभागृहाची भावना लक्षात घेता आजची मिटींग ही पुढे ढकलण्यात येते.

**प्रमोद (बंडु) खेडकर** प्रभारी आयुक्त हे बैठकीस उपस्थित नसल्यामुळे त्यांचा निषेधाचा ठराव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात यावा.

**स.सरजितसिंघ गिल** मिटींग पुढे ढकलण्यात आली असल्यामुळे कोणत्याही विषयावर चर्चा करण्यात येवू नये सर्व विषय हे पुढील मिटींगमध्ये घेण्यात यावे.

**महापौर** मिटींग पुढे ढकलण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणत्याही विषयावर चर्चा होणार नाही. राष्ट्रगित घेण्यात यावे.
**राष्ट्रगित घेण्यात आले.**

**महापौर** राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| **नावाशमनपा नांदेड** | **नावाशमनपा नांदेड** |